Review Of Research
ISSN 2249-894X

Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 4 | Issue - 11 | Aug - 2015

# सोलापूरच्या आर्थिक विकासात उद्योगधंद्याचे योगदान

**Pro. Dr. Vandana Abhij Bhanap**
Professor , DBF Dayanand College, Solapur.

**सारंश:-**



सोलापूरच्या आर्थिक विकासात उद्योगधंद्याचे योगदान या मुद्याचा अभ्यास करताना जे महत्वाचे उद्योग आहेत याचा या प्रकरणात अभ्यास केला आहे. हे प्रकरण कापड गिरण्या, हातमाग, उद्योग, यंत्रमाग उद्योग, विडी उद्योग, साखर उद्योग, हॉटेल व्यवसाय, इतर उद्योगामध्ये क्रॉस इंटरनॅशनल, बालाजी अमाइन, स्मृती ऑरगॅनिक, किर्लोस्कर फरस इंडस्ट्रीज लिमिटेड, सिमको स्पिनर्स लिमिटेड यामध्ये विभागले आहे. प्रत्येक प्रमुख मुद्दयाचा अभ्यास करताना कामगार, मालक, बाजारपेठ त्यामधून सोलापूरने केलेली प्रगती याचा आढावा घेतलेला आहे. अभ्यास कालखंडात सोलापूरवर नैसर्गिक दुष्काळाचे संकट आले, कामगार चळवळीमुळे वाढीमुळे वेतनवाढीचे संकट आले, जागतिक मंदिचे संकट आले. कांही कापड गिरण्या कायमच्या बंद झाल्याने संकट आले. सरकारकडून विविध कर आकारणीचे कारखानदारावर संकट आले, बाजारपेठामध्ये चढउताराचे संकट आले. तरीसुध्दा सोलापूरवासियांचा स्वभाव जिद्दी, दिर्घोउद्योगी असल्याने त्यावत मात करुन सोलापूरची प्रतिमा जपण्याचे काम सोलापूरकरानी केल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर हे औद्योगिकरणामधील एक अग्रेसर शहर म्हणून ओळखले जाते. सोलापूरच्या आर्थिक विकासाचा शोध घेत असताना हातमाग, उद्योगधंदे, कापडगिरण्या आणि विडी उद्योग यांचा प्रथमत: संदर्भ घ्यावा लागतो. या तिन्ही उद्योग धंद्याशी निगडीत असणाऱ्या कामगारांच्या चळवळी मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्या आहेत. त्याचा या प्रकरणात तपशीलवार अभ्यास केलेला नाही. सोलापूर शहरात आणि जिल्ह्यात पाऊस हा नेहमीच कमी पडतो. त्यामुळे पाणी पुरवठ्याच्या सुविधा त्यावेळी कमी होत्या. सोलापूर शहराच्या अवती भवती असणाऱ्या खेड्यातील कामगाराची मजूरी अत्यंत कमी होती. शेतकऱ्याच्या वाट्याला जिरायतीचे क्षेत्र आल्याने शेतीवर अवलंबून न राहता पर्यायाची कामाच्या शोधात सोलापूर शहरात येत . इंग्रजाच्या भारतातील व इग्लंडमधील कापड गिरण्या सातत्याने चालू राहण्यासाठी इंग्रज सरकारने कापूस उत्पादनासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले होते. कापड उद्योगामध्ये कापूस हा कच्चा घटक होता. सोलापूर शहर व जिल्ह्यातील जमीन कापूस उत्पादनासाठी योग्य होती. कापूस उत्पादन विपूल प्रमाणात यावे म्हणून एकरुख तलावाचे काम हाती घेऊन ते अल्पावधीत पूर्ण करण्यात आले. इंग्रजानी या तलावाचे पाणी शेतकऱ्यांना कापूस उत्पादनासाठी उपलब्ध करुन दिले[1]. शिवाय शेतकऱ्यांनी परंपरागत करडी, ज्वारी यांचे उत्पादन जिराईत जमीनीमध्ये घेतले होते. सोलापूर शहराला दुष्काळाचे नेहमी तडाखे बसत आले आहेत. त्यामुळे शेतकरी, कामगार, मागासवर्गीय , कारागिर यांना शहरातील हातमाग, विडी, कापड गिरण्या यामध्ये कामगार म्हणून काम करावे लागे. केवळ शहरामधील किंवा जिल्ह्यामधीलच नव्हे तर इतर राज्यातील अनेक लोक या शहराकडे आकर्षित झाले. स्वातंत्र्यपूर्वकाळात सोलापूर शहराचा **'गिरणगाव'** म्हणून नावलौकीक होता. हातमाग, कापड गिरण्या, जेकार्ड चादर निर्मीती, टर्कीश टॉवेल्स

निर्मीती, धोतर आणि साड्या यांची निर्मीती याशिवाय इतर छोटे मोठे व्यवसाय सोलापूर शहरात होते.

### अ) कापड गिरण्या (टेक्स्टाईल मिल्स)

सोलापूर शहराची खरी ओळख गिरणगाव म्हणून देशभर होती. सोलापूरचे हवामान, कुशल कारागिर, दळवळणाची साधने, कच्चा मालाचा पुरवठा, एकरुख तलावाचे पाणी, कापूस लागवडीसाठी पोषक वातावरण, स्वस्त मजुरीचे दर, मजुराची सहज उपलब्धता या कारणामुळे कापड उद्योग सुरु झाला व त्यामध्ये झपाट्याने प्रगती ही झाली.

सोलापूर शहरात १९ व्या शतकात पाच मोठ्या गिरण्या सुरु झाल्या. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याचे आर्थिक, सामाजीक जीवन विकसीत झाले. साहजिकच कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यातील कामगारांचे लोंढे सोलापूर शहरात आले. त्यामध्ये कुशल कारागिरांची संख्या मोठी होती. त्यामुळे सोलापूरची लोकसंख्या वाढत जाऊन भौतीक सुविधाची उपलब्धता झाली. गिरण्यामुळे बाजार पेठा निर्माण झाल्या. गिरणीला पूरक व्यवसाय वाढीस लागले. अनेकांना नोकऱ्या मिळाल्या. सामाजीक, आर्थिक, सांस्कृतिक विकास झपाट्याने झाला. सोलापूर स्पिनिंग अँड विव्हींग मिल (जुनी गिरणी १८७४), नरसिंग गिरजी मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, सोलापूर (१८९६),लक्ष्मी कॉटन मन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, सोालापूर (१८९६), दि जामश्री रणजीतसिंगजी स्पिनिंग अँड विव्हींग मिल्स कंपनी लिमिटेड (१९०९), विष्णू कॉटन मिल लिमिटेड (१९१०) या गिरण्या सोलापुरमध्ये सुरु झाल्या.

पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक महायुध्दामध्ये या सर्व गिरण्यांना भरपूर नफा मिळाला होता. पण त्यानंतर सर्व गिरण्यापुढे अनेक प्रश्न निर्माण झाले आणि पुढे हळूहळू सोलापूर मधील कांही गिरण्या बंद पडल्या. तर कांहो चालू राहिल्या .

### सोलापूरमध्ये कापड गिरण्या सुरु का झाल्या ?

सोलापूर प्रथमपासून प्रसिध्दीच्या झोतात राहिले आहे. ते कोणत्याही शाहीचे किंवा राज्याचे राजधानी बनू शकले नाही पण महत्वाचे केंद्र बनून राहिले आहे. या शहराने आपले वैभव टिकवुन ठेवले आहे. श्री सिध्देश्वर उर्फ सिध्दरामेश्वर यांचा जन्म बाराव्या शतकात झाला. त्यामुळे शहराची परकीय देशात प्रसिध्दी वाढली. चौदाव्या शतकात सोलापूरमध्ये भुईकोट किल्ला बांधला. निजामशाही व आदिलशाही यांच्यात त्यावर मालकी हक्क कोणाचा असावा म्हणून संघर्ष सुरु झाला. सोलापूरचा राजकीय इतिहास हा या किल्ल्यासी निगडीत आहे. या किल्ल्यामुळे सोलापूरचे संरक्षण झाले. सोलापूर शहर ब्रिटीशांच्या ताब्यात गेल्यानंतर त्याची नियोजनबध्द प्रगती केली. सोलापूरमध्ये कापड गिरण्या सुरु होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

**कमी पर्जन्यमान:** सोलापूर शहर व जिल्ह्यात पावसाचे प्रमाण नहमीच कमी असते. त्यामुळे त्याचा आर्थिक जीवनावर विपरीत परीणाम होतो.जनतेला कामाच्या शोधात रहावे लागते.

**दुष्काळाचे तडाखे :** कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळ पडतो. त्यामुळे शेतकरी, मजूर, कारागीर यांचे हाल होतात. त्याना पर्यायी कामाच्या शोधात रहावे लागते.

**पाटबंधारे योजनांचा अभाव :** शहरात पाटबंधारे योजनांचा अभाव होता. त्यामुळे रहिवाशाना पिण्याच्या पाण्याचा व शेतीला पाणी पुरवठ्याचा प्रश्न निर्माण होत असे. शेतकऱ्यांना जमीन असूनही त्यामुळे दुसरे पर्यायी काम शोधावे लागत होते.

**मजुरांची उपलब्धता :** सोलापूर शहरात व जिल्ह्यात वरील कारणामुळे मजूरांची भरपूर उपलब्धता होती. शिवाय मजुरीचे

दर कमी होते. मजुरीच्या दराच्या मानाने काम जास्त करावे लागत होते. सोलापूरच्या शेजारील खेड्यातून भरपूर प्रमाणात मजूर उपलब्ध होत होते.

**सोलापूरचे हवामान:** कापूस उत्पादनासाठी व कापड गिरण्यासाठो सोलापूरचे हवामान अनुकूल होते. हवामान उष्ण व दमट आहे.

**इंग्रजाचे कापूस उत्पादनाला प्रोत्साहन :** इंग्रजानी कापूस पिकाच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन दिले होते. बियाणांची उपलब्धता सवलती, पाणी पुरवठ्यांच्या योजना इत्यादिद्वारे प्रोत्सहान दिले होते.

**पाणी पुरवठ्यासाठो तलावाची स्थापना :** सोलापूरची जमीन अत्यंत सुपीक कसदार आणि काळीभोर आहे. कापूस पिकाच्या उत्पादनासाठी चांगली आहे. इंग्रज सरकारने जमीनीचा अभ्यास करुन जर शेतकऱ्यांला या पिकाच्या उत्पादनासाठी आपण पाणी उपलब्ध करुन दिले तर भरपूर प्रमाणावर कापूस उत्पादन होईल. कापड गिरण्यासाठी कापूस हा एक महत्वाचा घटक होता. या कच्च्या कापसावर प्रक्रिया करुनच कापडाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी इंग्रजांनी कापड गिरण्या सुरु केल्या. बार्शी तालुक्यात कोरेगांव तलावाची स्थापना (१८५५), सोलापूर शहरासाठी एकरुख तलावाची स्थापना (१८७१) आणि माढा तालुक्यात आष्टी तलावाची स्थापना (१८८१) अशा तीन तलावाची स्थापना करुन शेतीसाठी पाणी पुरवठ्याची योजना सुरु केली.

**रेल्वेची सुविधा :** दळणवळण आणि वाहतुकीच्या साधनामध्ये रेल्वे प्रभावी व वेगवान साधन आहे. दि. ६ जून १८६१ रोजी मोहोळ ते सोलापूर हा रेल्वे मार्ग सुरु झाला. त्यानंतर दि. १ फब्रुवारी १८७० रोजी सोलापूर हे रेल्वे माध्यमामधून दक्षिण भारतातील रेल्वे मार्गाला जोडले गेले[२]. कापड गिरणी उद्योगाला रेल्वे सुविधा हा घटक अत्यंत महत्वाचा ठरला.

**सोलापूर हे राष्ट्रीय महामार्गावरील प्रमुख शहर :** सोलापूर पुणे - हैद्राबाद (राष्ट्रीय महामार्ग क्र. ९), पुणे -विजापूर (राष्ट्रीय महामार्ग क्र.१३) या दोन राष्ट्रीय महामार्गानी जोडले गेले आहे. शिवाय आंध्रप्रदेश, कर्नाटक राज्य यामधील हैद्राबाद, बंगलोर, हुबळी, विजापूर यासारख्या राष्ट्रीयस्तरावरील प्रमुख शहराशी जोडले गेल आहे. तसेच रत्नागिरी, कोल्हापूर, मिरज, लातूर, मंगळवेढा, नांदेडमार्गे नागपूरपर्यंत जाणाऱ्या व औरंगाबाद हमरस्त्यावरील सोलापूर हे महत्वाचे शहर आहे [३].

**कुशल कामगार :** सोलापूरच्या आसपासच्या राज्यातून विशेषत: आंध्रराज्यातून नैसर्गिक संकटामुळे बरेच लोक सोलाप्रला आले होते. त्यापैकी काही लोकांना हातमागाची माहिती होती. १४ व्या शतकात सोलापूर शहरात कुशल कामगार होते. स्वस्त मजूर आणि कुशल कामगार कापड गिरणी उद्योग स्थापनेचे व विकासाचे मुख्य कारण होते.

यापमाणे सोलापूर शहरात कापड गिरण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याने भांडवलदारानी कापड गिरण्यांची निर्मीती केली.

## १) सोलापूर स्पिनिंग ॲन्ड विव्हींग मिल (जुनी गिरणी)

मुंबईचे प्रसिध्द मिल मालक शेठ मुरारजी गोकुळदास यांनी इ.स.१८७४ मध्ये सोलापूरमध्ये पहिला कापड गिरणीची मुहूर्तमेढ रोवली. ही मिल भारतातील जुन्या गिरण्यापैकी एक होती. सोलापूरमध्ये पुढे चार कापड गिरण्या सुरु झाल्याने या गिरणीचे जुनी गिरणी असे नाव पडले. इ.स. १८७७ साली गिरणीतून कापड उत्पादन सुरु झाले. सोलापूरच्या आर्थिक विकासाला खरी सुरुवात झाली ती या मिलच्या स्थापनेनंतर होय! मिल मालक गोकूळदास यानी कापड उत्पादनाबरोबरच शिक्षण, आरोग्य, वाचनालये, उपहारगृह, कामगारासाठी निवासस्थाने, समाजमंदिरे व तालीम अशा

समाजउपयोगी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या. पूर्वीपासून अठरापगड जातीने वसलेल्या सोलापूरला खऱ्या अर्थाने आर्थिक सुबत्तेचा मार्ग दाखविला तो गिरण्यानीच. त्या काळात गिरणी कामगाराला सरकारी नोकरवर्गापेक्षा अधिक प्रतिष्ठा असायची. यातूनच कामगाराच्या आर्थिक स्थैर्याबरोबरच सोलापूरच्या भरभराटीला सुरुवात झाली. सोलापूरचे वैभव समजल्या जाणाऱ्या या जुन्या मिलमध्ये कष्टकरी तेलुगू समाजाचे मोलाचे योगदान होते. वस्त्र विणण्याच्या कौशल्यामुळे त्याना त्या काळी विशेष मागणी असे. इ.स. १८७७ मध्ये पहिल्या वर्षी पुरुष, स्त्रिया आणि तरुण मुले अशी एकूण ३५० मजूर या गिरणीत कामाला होते. पुढे इ.स.१९४० मध्ये ही मजूर संख्या १५,५०० होती. त्यानंतर इ.स. १९६१ मध्ये ६००० एवढी मजूर संख्या वाढली. यावरुन या मिलची प्रगती लक्षात येते. इ.स. १९३९ मध्ये जगात दुसरे महायुध्द जर्मनीविरुध्द इंग्लंड यांच्या आघाडीत जोरदार सुरु झाले. ते सुमारे सहा वर्षे चालले. या काळात युध्दात सैनिकांच्या छावणीसाठी लागणारे तंबूचे कापड हे सोलापूरच्या जुन्या मिलमधून तयार होऊन संबंधीत ठिकाणी पाठविले जायचे. सर्कशीच्या तंबूसाठी लागणारे कापडही याच मिलमधून देशभर जायचे[७]. त्याचबरोबर गावठी कापड आणि टॉवेल्स इत्यादीचे उत्पादन होत होते. हे उत्पादन बार्शी, विजापूर व निजामच्या प्रदेशाकडे पाठविले जात होते. मिलने अनेक सामाजिक व कल्याणकारी कामे केली. ही मिल ८८ एकर्स एवढ्या विस्तीर्ण क्षेत्रात वसलेली होती. तिची चिमणी (धुराडी) सुमारे ३२५ फ्ट उंच होती. आशिया खंडात कापड गिरण्यामध्ये ही चिमणी सर्वाधिक ऊंच होती. या मिलला एकूण १६ प्रवेशद्वारे होती. या मिलच्या पुढे विस्तार झाला. दिनांक ६ मे १९०६ रोजी बी मिल आणि दि. १२ ऑगस्ट १९२१ रोजी सी मिल सुरु झाली. अशा रितीने एकाच ठिकाणी तीन मिल्स सुरु झाल्या .

पुढे ४३ वर्षानी या मिलला अनेक संकटाच्या मालिकेमधून जावे लागले. संघर्ष, बदलती आर्थिक धोरणे, आर्थिक मंदी, संप आणि अशा अनेक संकटामुळे ही मिल दि. २७ ऑगस्ट १९४९ रोजी बंद पडली. पुन्हा ती सुरु झाली तथापि तिला गतवैभव प्राप्त झाले नाही. दि. १० मार्च १९५८ रोजी पुन्हा गिरणी बंद पडली. गिरणी बंद पडू नये म्हणून जोरदार प्रयत्न करण्यात आले. पण ते अपयशी ठरले. शेवटी इ.स. १९६४ ला गिरणी कायमची बंद पडली.

इंग्लंड, अमेरीका, जर्मनी, फांस, स्विझर्लंड आणि जपान या परकीय देशातील रेयॉन, सिल्क धागे यांचा वापर या मिलमध्ये करण्यात येत होता. या मिलची सध्या इमारत नाही. इ.स. १९४९, इ.स. १९५८ ते इ.स. १९६३ या काळात मिल बंद पडल्यामुळे कागदपत्रे उपलब्ध नसल्याने माहिती मिळू शकत नाही. या मिलचे प्रकरण कोर्टात पडून आहे.

## २) नरसिंग गिरजी मॅन्युफंक्चरिंग कंपनी लिमिटेड, सोलापूर

जुन्या गिरणी मिलनतर सोलापूरमधील पोषक वातावरण, कामगारांची उपलब्धता, रेल्वेची दळणवळणाची सुविधा यामुळे हैद्राबादचे गिरणी मालक शेठ धनराज गिरजी यानी कापड गिरणी सुरु करण्याचे ठरविले. त्यानी सोलापूरचे श्री मल्लप्पा बसप्पा वारद यांच्या मदतीने नरसिंग गिरजी मिलची उभारणी केली. जुन्या मिलच्या शेजारी वारद यांची साडे सदोतीस एकर शेती होती. धनराज व अप्पासाहेब या दोघांनी मिळून भागीदारीत इ.स. १८९६ ला पब्लिक लिमीटेड कंपनी म्हणून मिलची नोंद केली. प्रत्यक्ष मिल दि. १३-२-१८९८ रोजी सुरु झाली. मेसर्स ग्यान गिरजी आणि मल्लप्पा वारद आणि कंपनी हे गिरणीचे पहिले एजंट होते. इ.स. १८९८ ते १९११ या काळात अप्पासाहेब वारद आणि ग्यान गिरजी हे भागीदार होते. ग्यान गिरजी यानी अप्पासाहेब वारद यांच्या मृत्यूनंतर दि. १९ जानेवारी १९११ रोजी अप्पासाहेबांचे पुत्र बाबासाहेब वारद यांचे मालकी हक्क बरखास्त केले. ग्यान गिरजी यांचे वडील नरसिंग गिरजी यांचे नाव मिलला देण्यात आले. इ.स. १९१२ ते १९५७ या काळात चंद्रभान गिरजी यांनी मिलचा कारभार पाहिला. सुरुवातीस केवळ सूत गिरणी (स्पिनिंग) म्हणून सुरु झालेल्या या मिलमध्ये इ.स. १९०६ पासून वस्त्र विणण्यास (विव्हिंग) सुरुवात झाली. या मिलमध्ये

इ.स. १९०३ मध्ये १२६८ कामगार होते तर इ.स. १९४० मध्ये ८००० कामगार होते. यावरुन मिलची प्रगती स्पष्ट होते .

### ३) लक्ष्मी कॉटन मॅन्युफक्चरिंग कंपनी लिमिटेड

सुरुवातीच्या काळात कामगारांच्या आयुष्यात आर्थिक सुबत्ता घेऊन येण्यासाठी इतर गिरण्यांबरोबर लक्ष्मी-विष्णू मिलचाही मोठा वाटा आहे. मुंबईचे उद्योगपती लखमीदास यांना दि. ३१ सप्टेंबर १८९६ रोजी ४८ एकर क्षेत्रात लक्ष्मी कॉटन म्यॅन्युफक्चरिंग कंपनी लि. या नावाने गिरणी चे बांधकाम सुरु केले. १००० रुपयांचे १६०० शेअर्स काढून १६ लक्ष भाग भांडवल जमवले. दि.१९ डिसेंबर १८९८ रोजी प्रत्यक्ष मिल सुरु झाली. इ.स. १९०१ मध्ये लखमीदास आणि कंपनी यांनी आपले सर्व हक्क बॉम्बे कंपनी, बॉम्बे यांच्याकडे हस्तांतरीत केले.

बॉम्बे कंपनीने भविष्यातील बदल लक्षात घेऊन आधुनिक साधन सामुग्रीचा वापर केला. वेळोवळी केलेल्या बदलामुळे आधुनिक यंत्राबरोबर आणि उत्पादनाच्या दर्जाकडे स्थापनेपासून लक्ष दिल्यामुळे अतिशय उत्तम प्रतीचे वस्त्र येथे तयार होत असे आणि त्यामुळेच देशभरातूनच नव्हे तर परदेशातून देखील मागणी वाढली . आस्ट्रेलिया, ऑकलंड, न्युझीलंड, पाकिस्तान या देशात या मिलचे कापड निर्यात केले जात होते.या करीता वस्त्रोद्योग महामंडळाकडून मिलला सुवर्णपदकही मिळाले. या गिरणीमधून लष्कराला लागणाऱ्या उत्कृष्ठ दर्जाच्या कॅनव्हासचे उत्पादनही या गिरणीतून होत असे. आधुनिकतेचा अवलंब केल्याने या गिरणीने अल्पावधीतच नफा कमविला व मिलची प्रगती होत गेली. लक्ष्मी मिलने आधुनिक यंत्रे व उत्पादनाचा दर्जा याविषयी काळजी घेतल्याने नफा मिळविलेला होता.

### ४) दि जामश्री रणजीतसिंगजी स्पिनिंग अँड विव्हींग मिल्स कपंनी लिमिटेड

१९ व्या शतकामध्ये सोलापूरमध्ये कापड गिरण्यांचा उदय झाला आणि गिरणगांव म्हणून सोलापूरची नव्याने ओळख निर्माण झाली. या काळातील शेवटची कापड गिरणी दि जामश्रीने कामगारांना रोजीरोटी दिली. या मिलची स्थापना इ.स. १९०९ मध्ये लालजी मोरारजी आणि कंपनी यांच्या अधिपत्याखाली झाली. दि.१० डिसेंबर १९०७ रोजी मिलच्या बांधकामास सुरुवात झाली. दि. २८ ऑगस्ट १९०९ रोजी बांधकाम पूर्ण झाले. ३५ एकरात मिलची स्थापना करण्यात आली. इ.स. १९११ मध्ये व्यवस्थापन समिती बदलून श्री लालजी नारायणजी आणि कंपनी यांच्याकडे आली. १० लाखाचे भांडवल गुंतवून सुरु झालेली ही मिल इतर मिलच्या तुलनेत लहान होती. मात्र नवीन यंत्राच्या वापराने प्रगती साधत गेली. इ.स. १९५५ मध्ये जामश्री मिल लालजी शेठकडून प्रेमरतन दमाणी आणि नवरतन दमाणी बंधूच्या ताब्यात आली. दमाणी परिवाराने काळाची पावले ओळखून नवनवीन तंत्रज्ञान विकसित करीत मिलची भरभराट केली.

### ५) विष्णू कॉटन मिल लिमिटेड सोलापूर

लक्ष्मी कॉटन मॅन्युफक्चरिंग कंपनीच्या बरोबर विष्णू कॉटन मिल लिमिटेडची स्थापना दि बॉम्बे कंपनीकडून करण्यात आली. दि. १ जुलै १९१० पासून मिलच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांच्या हस्ते इ.स.१९५०-५१ मध्ये मिलमध्ये स्वयंचलित ४८ लूम्स बसविण्यात आले होते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे मिलने देखील अल्पावधीत नफा कमविला. सुरुवातीला ३२,४६० चात्या व ७,७०३ लूम्स होते. इ.स. १९२३ मध्ये ९,८०४ चात्या, इ.स. १९२५ मध्ये ४,३४४ चात्या, इ.स. १९२९ मध्ये २,७८४ चात्या नव्याने बसविण्यात आल्या. इ.स. १९४४ मध्ये या मिलने ७७,१७,१३८ रु. इतका नफा कमविला. यावरुन मिलची प्रगती समजते व मिळालेला प्रचंड नफा लक्षात घेता इथला

कामगार सामाजिक व आर्थिकदृष्ट्या समाधानी होता. या दोन्ही मिलने सोलापूर शहरातील अनेक परिवारांना आर्थिक स्थैर्य दिले.

ज्या काळात मुलभूत सुविधा मिळायलाही मारामार असायची त्या काळात उत्पादीत केलेला माल ने -आण करण्यासाठी लिफ्टची सुविधा होती.

## संदर्भ


१) डॉ. डी.डी. रणनवरे, हिस्ट्री ऑफ सोलापूर, २०००,पृ.१६४.

२) तत्रैव,पृ.२४५.

३) दिशा, सोलापूर महानगरपालिका माहिती पुस्तक, २००२, पृ.८.

४) सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझेटियर १९७७, पृ.३८४.

५) दै. लोकमत , सोलापूर दि. ३.७.२०१३.पृ.४.

६) बॉम्बे प्रेसिडेन्सी पब्लिकेशन एन- ३५२३७.

७) दै. लोकमत , सोलापूर, दि. ३.७.२०१३. पृ.४.

८) तत्रेव दि.२.७.२०१३.पृ.४.

९) इंडस्ट्री अशोक इंटरनॅशनल टेक्स्टाईल्स रिपोर्ट.

१०) जे.पी. मारु,नोट्स ऑफ प्रपोजड मॉडरनायाझेशन स्कीम ऑफ नरसिंग गिरजी मिल,सोलापूर , १९६६.पृ.क्र. दिला नाही.

११) व्ही. एन.जक्कल, सोलापूर शहराचा इतिहास १९३६, पृ. ६३-४.

१२) बॉम्बे प्रेसिडेन्सी पब्लिकेशन एन, तत्रैव.

१३) दै. लोकमत, सोलापूर , दि. ४.७.२०१३.पृ.४.

१४) तत्रैव, दि. ५.७.२०१३.पृ.४.

१५) साप्ताहिक समाचार सालापूर , दि. २५.७.१९७२.